जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
24 FEB 2020

तरुण भारत


# जीवनातील तणाव दूर करण्यासाठी कला उपयुक्त

## प्राचार्य अजय दळवी यांचे प्रतिपादन : शिवाजी विद्यापीठात कार्यशाळा

प्रतिनिधी
कोल्हापूर

मानवी जीवनातील तणाव दूर करण्यासाठी कला उपयुक्त ठरते, असे प्रतिपादन दळवीज आर्टसूचे प्राचार्य अजय दळवी यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील विद्यार्थी विकास विभागामार्फत विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील विद्यार्थी विकास कक्ष समन्वयकांसाठी एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन भाषा भवन सभागृहामध्ये केले होते.



**कोल्हापूर : विद्यापीठातील विद्यार्थी विकास विभागामार्फत कार्यशाळेत मार्गदर्शन करताना प्राचार्य अजय दळवी. सोबत डॉ. आर. व्ही. गुरव आदी.**

प्राचार्य दळवी म्हणाले, कलेचा संबंध माणसाच्या आचार, विचार, भावना व निसर्गातील घटकांशी असतो. कला चित्र, शिल्प, गायन, वादन, कथा, कविता, नृत्य, अभिनय यातून मूर्तस्वरूपात आणता येतो. मूर्त स्वरूप आणताना कौशल्याची जोड देणे आवश्यक आहे. कला माणसाला जीवनामध्ये परिपक्व बनवते. आयुष्यामध्ये प्रत्येकजण कोणत्या ना कोणत्या प्रकारच्या कलेचा पुरस्कर्ता असतो. याप्रसंगी कव्वाली, इंद्रधनुष्य, पश्चिम विभागीय युवा महोत्सव व राष्ट्रीय युवा महोत्सवातामध्ये प्राविण्य प्राप्त विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देवून सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाचे प्रभारी संचालक डॉ. आर. व्ही. गुरव यांनी केले. डॉ. के. टी. पाटील यांनी आभार मानले.

**उद्‌घाटन :** शिवाजी विद्यापीठाच्या वतीने 'कार्निवल २०२०"चे उद्‌घाटन. स्थळ : शिवाजी विद्यापीठ. वेळ : सकाळी १० वाजता.

# तणाव दूर करण्यासाठी कला उपयुक्त

## अजेय दळवी : शिवाजी विद्यापीठातील कार्यशाळा

लोकमत न्यूज नेटवर्क



शिवाजी विद्यापीठातील विद्यार्थी विकास विभागाच्या कार्यशाळेत मंगळवारी प्राचार्य अजेय दळवी यांनी मार्गदर्शन केले. यावेळी शेजारी आर. व्ही. गुरव, के. टी. पाटील उपस्थित होते.

कोल्हापूर : कलेचा संबंध माणसांच्या आचार-विचार, भावना व निसर्गातील घटकांशी असतो. त्यामुळे मानवी जीवनातील तणाव दूर करण्यासाठी कला उपयुक्त ठरते, असे प्रतिपादन दळवीज् आर्ट इन्स्टिट्यूटचे प्राचार्य अजेय दळवी यांनी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागामार्फत संलग्नित महाविद्यालयातील विद्यार्थी विकास कक्ष समन्वयकांसाठी मंगळवारी (दि. १८) आयोजित कार्यशाळेत ते बोलत होते.

विद्यापीठाच्या भाषा भवनमधील या कार्यशाळेत दळवी म्हणाले, कला चित्र, शिल्प, गायन, वादन, कथा, कविता, नृत्य, अभिनयातून मूर्त स्वरूपात आणता येतो. मूर्त स्वरूप आणताना कौशल्याची जोड देणे आवश्यक आहे. कला माणसाला जीवनामध्ये परिपक्व बनवते.

या कार्यशाळेत कव्वाली, इंद्रधनुष्य, पश्चिम विभागीय युवा महोत्सव व राष्ट्रीय युवा महोत्सवामध्ये प्रावीण्य प्राप्त विद्यार्थ्यांचा प्राचार्य दळवी यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. विद्यार्थी विकास विभागाचे प्रभारी संचालक डॉ. आर. व्ही. गुरव यांनी प्रास्ताविक केले. डॉ. के. टी. पाटील यांनी आभार मानले.

# मराठा भाषा दिनानिमित्त शिवसेनेतर्फे कार्यक्रम

कोल्हापूर : मराठी भाषा गौरव दिनानिमित्त २७ फेब्रुवारीला शिवसेनेच्यावतीने कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. दुपारी १२ वाजता बिंदू चौक येथे ग्रंथपूजन व मराठी भाषेच्या सन्मानासाठी शपथ घेण्यात येणार आहे. यावेळी महापौर निलोफर आजरेकर उपस्थित राहणार आहेत. २६ फेब्रुवारीला मराठी भाषा अनिवार्य करण्यासाठी शिक्षण उपसंचालकांना निवेदन देण्यात येणार आहे. २८ रोजी दुपारी १२ वाजता निरुपणकार मारुतराव जाधव यांचा सत्कार शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते करण्यात येणार आहे.

# विद्यापीठात विदेशी भाषा विभागातर्फे आज ‘कार्निव्हल’

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ विदेशी भाषा विभागातर्फे सोमवारी (दि. २४) वि. स. खांडेकर भाषा भवन येथे ‘कार्निव्हल’चे आयोजन करण्यात आले आहे.

कार्निव्हलअंतर्गत रशिया, जपान, जर्मनी आणि पोर्तुगाल या देशांचे वैशिष्ट्य सांगणाऱ्या काही पारंपरिक व कलात्मक वस्तूंचे प्रदर्शन भरविण्यात आले आहे. प्रदर्शनात पोस्टर्स, फोटोज, त्या देशांची खाद्यसंस्कृती, तेथील घरांची रचना, काही प्रसिद्ध लेखकांची पुस्तके आणि दैनंदिन जीवनात वापरल्या जाणाऱ्या दुर्मीळ वस्तू यांचा समावेश आहे. पोर्तुगाल देशाची खाद्यसंस्कृती सांगणारे काही विशेष खाद्यपदार्थ प्रदर्शनामध्ये असणार आहेत. दि. २५ रोजी सांस्कृतिक कार्यक्रम होईल. विद्यापीठातील विद्यार्थी, शिक्षक व नागरिकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन विदेशी भाषा विभागप्रमुख डॉ. मेघा पानसरे यांनी केले आहे.

# कायकिंग स्पर्धेत वैयक्तिक प्रकारात सुवर्णपदक

## सांघिकमध्ये शिवाजी विद्यापीठाला रौप्य

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

अखिल भारतीय विद्यापीठ आणि उदयपूर (राजस्थान) येथील मोहनलाल सुखाडिया विद्यापीठामार्फत फतेहपूर लेक येथे झालेल्या चारदिवसीय कायकिंग स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या खेळाडूंनी शनिवारी वैयक्तिक प्रकारात सुवर्ण आणि सांघिक प्रकारात २०० मीटरमध्ये रौप्यपदक पटकाविले.

या स्पर्धेत सहभागी होण्याचे शिवाजी विद्यापीठाचे हे दुसरे वर्ष आहे. उदयपूर येथील मोहनलाल सुखाडिया विद्यापीठाने या स्पर्धेत सुवर्ण तर पंजाब विद्यापीठाने कांस्यपदक पटकावले. या स्पर्धेत देशातील २४ विद्यापीठांनी भाग घेतला होता.



**कोल्हापूर : फतेहपूर येथील राष्ट्रीय स्तरावरील कायकिंग स्पर्धेत शनिवारी शिवाजी विद्यापीठाच्या खेळाडूंनी रौप्यपदक पटकावले. खेळाडूंसोबत प्रशिक्षक डॉ. धनंजय पाटील उपस्थित होते.**

शुक्रवारी या संघाने ५०० मीटरमध्ये के ४ या प्रकारात कांस्यपदक पटकावले होते. फतेहपूर लेक येथे १९ फेब्रुवारीपासून सुरू झालेल्या या स्पर्धांचा समारोप शनिवारी झाला. स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या खेळाडूंनी अंतिम फेरीत धडक मारली होती. कायकिंगच्या २०० मीटरमध्ये के ४ या प्रकारात या संघाला रौप्यपदक मिळाले, तर कायकिंगच्या २०० मीटरमध्ये के १ या प्रकारात गिरीश नेर्लेकर याने वैयक्तिक सुवर्णपदक पटकावले.

स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या संघातून गिरीश नेर्लेकर, ओंकार जाधव, ओंकार पाटील आणि सोहम मगदूम या खेळाडूंनी भाग घेतला. केनोईंग आणि कायकिंग स्पर्धे पैकी कायकिंग प्रकारात शिवाजी विद्यापीठाच्या ९ खेळाडूंनी भाग घेतला होता. बक्षीस वितरण मोहनलाल सुखाडिया विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. एन. एस. राठोड, आयोजन समितीचे अध्यक्ष प्रा. आय. वि. त्रिवेदी, सचिव डॉ. हेमराजसिंग चौधरी, सदस्य प्रा. आनंद पालिवाल यांच्या हस्ते झाले. यावेळी शिवाजी विद्यापीठाचे प्रशिक्षक डॉ. धनंजय पाटील आदी उपस्थित होते. या खेळाडूंना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, क्रीडा विभाग प्रमुख डॉ. पी. टी. गायकवाड यांचे प्रोत्साहन आणि मार्गदर्शन लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
24 FEB 2020
Times of India

## Art relieves stress, says veteran painter

Veteran painter and principal of the Dalvi's Art Institute, Ajay Dalvi, in a workshop conducted at the Shivaji University, Kolhapur, said that art relieves stress and is an important tool in today's life. He was speaking at the workshop organized by student development cell of the university.

## Biodiversity conservation need of the hour

Veteran botanist Madhukar Bachulkar, in a lecture series at the Shivaji University, Kolhapur, said that conservation of biodiversity is the need of the hour.

He said that of the total biodiversity that exists on the earth, only 18-20% has been studied scientifically.

# शिवाजी विद्यापीठात आज 'बाल न्याय अधिनियमा'वर प्रशिक्षण कार्यक्रम

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, जिल्हा बाल संरक्षण कक्ष आणि शिवाजी विद्यापीठ सामाजिक वंचितता व समावेश धोरण अभ्यास केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवारी (दि. २४) विद्यापीठातील मानव्यशास्त्र सभागृह येथे 'बाल न्याय अधिनियम-२०१५ व दत्तक कायदा' या विषयावर एकदिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव तथा न्या. पंकज देशपांडे यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन होणार आहे. अध्यक्षस्थानी सामाजिक वंचितता व समावेश धोरण अभ्यास केंद्राचे संचालक प्रा. डॉ. जगन कराडे असणार आहेत. बालकल्याण समितीचे सदस्य प्राचार्य डॉ. जे. के. पवार मार्गदर्शन करणार आहेत. यावेळी जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी बी. जी. काटकर, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी सागर दाते यांच्यासह मान्यवर उपस्थित राहणार आहेत.